जा. क्र. प्रा/प्राशि/मान्यता/पीआर/
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ याचे
कार्यालय. दिनांक:- / /१९९०.

प्रति,
शिक्षणाधिकारी [प्राथमिक विभाग.]
जिल्हा परिषद, पुणे

विषय:- सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी प्राथ. शाळांना परवानगी देणे बाबत.

संदर्भ :- शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग
क्र. व्हीएलएस १०९२) (९४/९४) प्राशि-३
दिनांक.. २३-११-९४ चे पत्र.

उपरोक्त विषया संबधीचे आपल्या कार्यालयात पृष्ठांकित केले शासनाकडील संदर्भाधीन पत्र कृपया अवलोकन करावे.

या बाबत कळविण्यात येते की, खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्या बाबत शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदी ला अपवाद करुन खाली नमुद केलेल्या संस्थेला तीच्या नांवासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातुन जून १९९४ पासून इयता १ ली ते सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमुद केलेल्या अटीची पूर्तता करण्याचा शर्ती वर विनाअनुदान ततवार "खास बाब" म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचेनांव | शाळेचे नावं व ठिकाण | इयत्ता. | माध्यम. |
|---|---|---|---|
| पीपल्स एज्युकेशन सोसायटी, इंदापूर जि पुणे. | इंदापूर | ३ री ते सन ९२-९३ चा शैक्ष. वर्षात सुरु असलेल्या प्रत्यक्ष वर्गासह | इंग्रजी. |

१. संस्था सदर शाळा विनाअनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिक दृष्टया सक्षम असली पाहीजे.
२. संस्थेने शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहित केलेल्या अटीनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधाचे सोय केली पाहीजे तसेच शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमलं पाहिजे व त्यांना शासनाने विहित केलेल्या दरानेच वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

[ पान २ वर]

३. संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाची उदा. वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इत्यादी काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.
४. संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही दुष्परीणाम होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

५. ही परवानगी देण्यापूर्वी संस्थे बाबत खाली नमुद केलेल्या बाबींची खात्री करुन घेऊन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्या बाबत कार्यवाही करण्यात यावी.

१. संबधीत संस्था, संस्था नोंदणी अधीनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणी कृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळांपैकी एखाद्या शाळेचे मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबधीत संस्थेत कोणत्याही प्रकारचा गैर व्यवहार चालत असल्याबाबत या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमुन्यात सशुल्क अर्ज केला आहे. [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करुन घ्यावा.]
७. शासनाची मंजूरी नसताना प्राथमिक शाळा चालु ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रुपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी या बाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयास पाठवावा.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

शोहा/-

प्रत:-
प्रशासन अधिकारी/महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ ________
जिल्हा ________ यांना माहिती व पुढील कार्यवाही साठी.
प्रत:- मा. सचिव, पीपल्स एज्युकेशन सोसायटी इंदापूर जि. पुणे.

पुणे जिल्हा परिषद, पुणे
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण विभाग [प्राथ]
जा. क्रं. शिक्षण/प्राथ/२/४/नुक-७/९६
पुणे-१ दिनांक:- ५ .६. १९९६

प्रति,

मुख्याध्यापक
प्रियदर्शनी इंग्लीश मेडियम
स्कूल इंदापूर ता. इंदापूर

विषय:- सन १९९५-९६ मध्ये अनुदानित / विनाअनुदानित खाजगी प्राथमिक शाळेच्या नैसर्गिक वाढीच्या वर्गांना परवानगी देणे बाबत.

संदर्भ:- मा. शिक्षण उप संचालक पुणे विभाग पुणे यांचेकडील पत्र क्रं. प्रा/प्राशि/जा. क्रं. पोआर/३५२२ दि. २९. ३. ९६ व प्रा/प्राशि/खाप्राशा/जा. क्रं. /पोआर/३४७३ दि. २७. ३. ९५

संदर्भिय विषयानुसार आपणास कळविणेत येते की, आपल्या शाळेस सन १९९५-९६ या वर्षासाठी जून ९५ पासून खाली दर्शविलेल्या इयत्तांना नैसर्गिक वाढीचे / ~~जादा तुकडीत कायम स्वरूपी अनुदान तत्वावर~~ / विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत आहे.

| अ. क्रं. | शाळेचे नांव | इयत्ता | जादा तुकडी नैसर्गिक तुकडी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | प्रियदर्शनी इंग्लीश मे स्कूल इंदापूर | ५ वी | नैसर्गिक वाढीचे प्रथम वर्ग | |

शिक्षणाधिकारी [प्राथ]
पुणे जिल्हा परिषद, पुणे.

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१,
यांचे कार्यालय.
दिनांक :- / /१९९
16 MAR 1996

प्रति,
सचिव,
पिपल्स एज्युकेशन सोसायटी,
इंदापूर, जि. पुणे.

विषय :- सन १९ ९५-९६या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत

संदर्भ :- शासन पत्र क्रमांक: एसएसएन - १०९५ /७८४ /माशि-१, दि. १७ नोव्हेंबर १९९५

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदाला अपवाद करुन खालील दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून १९९५ - ९६ पासून ~~विना/अनुदान/तत्वावर~~ /कायम विनाअनुदान तत्त्वावर "विशेष बाब म्हणून नवीन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच नमुद केलेल्या अटींचो पुर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

१] या नवीन माध्यमिक शाळांना [ इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त ] शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक एसएसएन्-१०८८/१६६९ एन्, माशि-१, दिनांक १०/२/८९ अन्वये विहित केलेल्या नवीन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

२] सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशाचे [ उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांती कर्मचारी [ सेवेच्या शर्ती ] नियमावली १९८१ चे इ. काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

३] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

४] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [ ई. बी. सी ] फी च्यापरताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षाचे सहीचे लेखी हमीपत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

५] जादा उघडण्यात आलेल्या तुकड्यातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्य देण्यात यावेत. तसेच प्रवेशाच्यावेळी विद्यार्थ्याकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्विकारण्यात येवू नये.

६] महाराष्ट्र शैक्षणिक संस्था [ प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज ] कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी/वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये.

७] माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [ सेवेच्या शर्ती ] नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

८] संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोष्टरप्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येईल.

९] शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी [ माध्य. ] यांचेकडून मंजुर करुन घेण्यात येईल.

१०] माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्ययावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

११] शालेय वातावरण, इमारत प्रयोगशाळा, इ. बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधानेयुक्त ठेवण्यात येतील.

मुंबई

इतर अटी
=======

१] संबंधित संस्था^सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० ...गर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळापैकी एखादया शाळेची मान्यता काढून घेतली नाही. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

वरील बाबींपैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १] | पिपल्स एज्युकेशन सोसायटी, इंदापूर. | इंदापूर | आठवी जून ९५ पासून | इंग्रजी |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३.१.ब नुसार ...ाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आत विहीत प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची ...थम मान्यता करिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय ...डळाने संस्थांना मान्यता देण्याची पध्दती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहीत केलेल्या नियमाप्रमाणे ... प्रपत्रात अर्ज करावा.

स्वाक्षरी

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, करिता

मूळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक यांची स्वाक्षरी आहे.

प्रतिलिपी,

१] शिक्षणाधिकारी [ माध्य.] जिल्हा परिषद, पुणे.

आवश्यक त्या कार्यवाही करता अग्रेषित,

त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देऊन पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था ...र्ण करते किंवा नाही याची तपासणी करुन अहवाल त्वरित या कार्यालयात पाठवावा. तसेच संस्थे-विरुध्द तक्रारी व गैरव्यवहाराची उदाहरणे आपल्या कार्यालयात प्राप्त झाले असल्यास त्या विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयात सादर करावा. नवीन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची ...र्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग - २ पेक्षा कमी नसणाऱ्या अधिकाऱ्यांकडून तपा-सणी करुन आपल्या अभिप्रायांसह तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

२] मा. उपसचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ३२,

३] मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे - १, यांना सविनय सादर,

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2023 ◑ 67AA 724262

रुपये 100 अनुक्रमांक 4033 दिनांक 16/10/23

प्रतिज्ञापत्र को ... करावयाचे ...

प्रतिज्ञापत्रासाठी ...

मुद्रांक विकत घे... परंबत गंगाधरन नायर

...ठिकाणी पत्ता ...

हस्ते व्यक्तिचे नांव 21- 28142

हस्ते व्यक्तीचा प... 20/.01

13 OCT 2023

Sub Treasury Officer

Indapur Dist-Pune

मुद्रांक धारकाची/हस्ते व्यक्तीची सही

मुद्रांक ... (पुणे)

परवाना क्र. ...६०१४

मुद्रांक विक्रीचे ठिकाण-इंदापूर (पुणे)

प्रतिज्ञापत्र

मा.तालुका कार्यकारी दंडाधीकारी सो.इंदापूर,ता.इंदापूर, जिल्हा पुणे.यांचे समोर...

मी **श्री. परंबत गंगाधरन नायर, रा. इंदापूर, ता.इंदापूर, जि. पुणे.** सत्यप्रतिज्ञेवरून कथन करतो की, मी **पिपल्स एज्युकेशन सोसायटी** या संस्थेची **प्रियदर्शिनी इंग्लिश मिडियम स्कुल** हया एकमेव शाळेचा अध्यक्ष आहे. आमची शाळा गेली ३५ वर्षापासून इंदापूर या ठिकाणी कार्यरत आहे.

आमच्या संस्थेच्या **प्रियदर्शिनी इंग्लिश मिडियम स्कुल** या शाळेस **सन १९९२-९३ पासून इ. १ ली ते ६ वी पर्यंतच्या** वर्गांना परवानगी दिली आहे. **जा.क्र. व्हीएलएस.१०९२/(६४८४)प्राशि-३ शिक्षण उपसंचालक पुणे विभाग, पुणे-१** यांनी इ.१ ली ते सन १९९२-९३ या शैक्षणिक वर्षापासून सुरु असलेल्या प्रत्यक्ष वर्गासह आम्हाला दि. २३/११/१९९२ रोजी परवानगी मिळाली आहे. सदर वर्षी आमचे इ. १ ली ते ६ वी चे वर्ग सुरु होते. तद्नंतर आम्हाला ०६/४/१९९६ रोजी जुन -१९९५ पासून इयत्ता ७ वी वर्गास नैसर्गिक वाढीने प्रथम वर्ग म्हणून **शिक्षणाधिकारी (प्राथमिक) पुणे जिल्हा परिषद, पुणे** यांनी परवानगी दिली आहे. त्यानंतर १६/०३/१९९६ रोजी आम्हास **शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे** यांनी इयत्ता ८ वी या वर्गास जुन १९९५ पासून परवानगी दिली आहे. अशा पद्धतीने आम्हाली १ ली ते ८ वी प्राथमिक विभागाच्या परवानग्या मिळालेल्या असून सदर सर्व कागदपत्रे आमच्याकडे उपलब्ध आहे. सदर कागदपत्रांच्या आधारे आम्हाला सन २०१३ ते २०१६ व २०१६ ते २०१९ अशा दोन स्वमान्यता प्राप्त झालेल्या आहेत.

प्रतिज्ञापत्रातील सर्व मजकुर खरा व बरोबर असुन त्यात काही चुक अगर तफावत आढळुन आलेस मी भारतीय दंडविधान संहिता कलम १९९, २०० व १९३/२ नुसार शिक्षेस पात्र राहीन हे मला मान्य आहे.

सदरचे प्रतिज्ञापत्र आज दिनांक :- १७/१०/२०२३ रोजी लिहून दिले असे.



लिहून देणार

12682310172004497045

Affidavit No : 23521420012685005058651 9322

Applicant Name : **Nayar P G**

Tehsil Name : **Indapur**



Revenue Circle, Executive Magistrate ★ Indapur, Tal.Indapur Dist.Pune ★ सत्यमेव जयते

Date : **17/10/2023**

Signed and Sworn before by **Shri Nayar P G** who is personally known to me or who has been identified by Shri / Smt / Kumari **Jamadar I Y** whose signature is hereby appended.

Signature Of Identifier
**Jamadar I Y**

Executive Magistrate
**Indapur**
Date : **17/10/2023**